udyan- -

/62806/2023

# सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

'इंद्रभुवन' आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३ ००१.
दूरध्वनी ०२१७- ०२७४०३००
( सामान्य प्रशासन विभाग. ईमेल :- smcaados2@gmail.com )

जा.क्र.सआस/Zoo/जाहिरात/आस्था-२/२८४ सोलापूर दि. ०२/०५/२०२३ /०४/२०२३ E-27821

-: जाहिरात प्रसिध्दिकरण :-

**WALK - IN- INTERVIEW**

दि:१२/०५/२०२३, वेळ:- ११.३० वाजतां

( अर्ज स्विकारण्याची वेळ :- सकाळी ०८.०० ते ११.०० )

**स्थळ :- सामान्य प्रशासन विभाग, सोलापूर महानगरपालिका, सोलापूर.**

सोलापूर महानगरपालिकेच्या उद्यान विभाग अंतर्गत प्राणी संग्रहालयाकडील खालील नमूद यापदाकरीता दर्शविलेल्या शैक्षणिक पात्रताधारण करणा-या पात्र उमेदवारांकडून / सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारीकडून अर्ज मागवून Walk - in-Interview व्दारे केवळ तात्पुरत्या स्वरुपात **सहा महिन्याच्या** कालावधी करीता शर्ती व अटीवर भरण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | पदसंख्या | शैक्षणिक अर्हता | मानधन प्रति महा. |
|---|---|---|---|---|
| १ | प्राणी संग्रहायल संचालक | १ | • मान्यताप्राप्त विद्यापिठाची पशु वैद्यकिय शास्त्रातील पदव्युत्तर पदवी (एम.व्हि.एस.सी.)<br>• अनुभव : प्राणी संग्रहालयाशी संबंधीत कामाचा ५ वर्षाचा अनुभव धारकास प्राधान्य | र.रू. ४५,०००/- प्र.म. अशी असून योग्य उमेदवार भेटल्यास मानधनामध्ये वाटाघाटी करण्यात येईल. |
| २ | पशु वैद्यकिय अधिकारी | १ | • मान्यताप्राप्त विद्यापिठाची पशु वैद्यकिय शास्त्रातील पदव्युत्तर पदव्युत्तर पदवी<br>• अनुभव : पशु वैद्यकिय अधिकारी पशु चिकित्सक म्हणून शासकीय/निमशासकीय/स्था.स.संस्थामध्ये किमान ०३ वर्षाचा अनुभव धारकास प्राधान्य. | र.रू. ३०,०००/- प्र.म. अशी असून योग्य उमेदवार भेटल्यास मानधनामध्ये वाटाघाटी करण्यात येईल. |
| ३ | जीवशास्त्रज्ञ | १ | • मान्यताप्राप्त विद्यापीठाची प्राणीशास्त्र/सुक्ष्मजीव शास्त्र विषयातील पदव्युत्तर पदवी<br>• पदव्युत्तर पदवी आणि अथवा आरोग्य सेवेतील हिवताप निर्मुलन कामाचा अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारांस प्राधान्य | र.रू. २०,०००/- प्रति महा. |

**शर्ती व अटी :-**

१. मा.शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही - २०१०/प्र.क्र.१७/२०००/१२ दि.१ जुलै २००५ नुसार कुंटुंबांची अट लागू असून त्यानुसार दि.२८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असू नये. सदर नियमाचे प्रतिज्ञा पत्र नमुना 'अ' नुसार उमेदवारांने सादर करावयाचे आहे.

udyan-
/62806/2023

२. आपली नियुक्ती ही केवळ तात्पुरत्या स्वरूपात व एकवट मानधनावर असून पुर्णवेळ काम करण्याच्या अटीवर राहिल.

३. संबंधीत उमेदवारांचे चारित्र्य पडताळणी पोलीस यंत्रणेमार्फत करून घेण्यात येईल. सदर पडताळणीमध्ये उमेदवार दोषी आढळल्यास त्यांची तात्काळ सेवा समाप्त करण्यात येईल.

४. इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीसाठी त्यांचे संपूर्ण परिचयपत्र, सर्व आवश्यक कागदपत्रांच्या एक सांक्षाकित प्रती, पासपोर्ट साईज फोटो व मुळ कागदपत्रे व त्यांच्या छायांकित प्रतीसह वरील तारखेस दिलेल्या वेळेत उमेदवारांनी मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित राहणेचे आहे.

५. उपरोक्त पदभरती ही केवळ कामकाजाच्या सोयीकरीता व तात्पुरत्या स्वरूपात करण्यात आलेली असल्याने पदभरतीमधील उमेदवारांना मनपा सेवाप्रवेश व कायम सेवकांप्रमाणे कोणतेही लाभ लागू राहणार नाही.

६. वर नमूद शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकारी ही अर्ज करू शकंतील. ( ही अट केवळ प्राणी संग्रहालय संचालक व पशु वैद्यकिय अधिकारी पदासाठी लागू राहिल)

७. स्थानिक परिस्थितीनुसार शर्ती व अटी बाबत मा.आयुक्त यांचा निर्णय अंतिम राहील

८. कोणतेही कारण न देता निवड प्रक्रिया स्थगित ठेवण्याचे/रद्द करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना राहतील.

९. नियुक्तीसाठी कसल्याही प्रकारचा दबाव/गैरमार्गाचा अवलंब केल्यास उमेदवारी कोणत्याही टप्पावर कसलीही कल्पना न देता रद्द करण्यात येईल व त्याबद्दल कसलीही तक्रार करता येणार नाही.

१०. सदरची नियुक्ती ही केवळ ठराविक कालावधी करीता व नमूद एकवट मानधनावर तात्पुरत्या स्वरूपाचे असल्याने नियुक्तीं पूर्वी रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर सर्व शर्ती व अटी मान्य असलेबाबत स्‌दस्‌द विवेकबुध्दीने प्रतिज्ञापत्र करुन दयावे लागेल.

११. इच्छुक उमेदवारांनी सदर दिवशी सकाळी ०८.०० ते ११.०० या वेळेत अर्ज सादर करावा. कागदपत्राची पडताळणी करण्यासाठी सोबत मूळ कागदपत्रे आणावी.

( शीतल तेली-उगले, भा.प्र.से.)
Signed by Sheetal Teli -ugale
आयुक्त
सोलापूर महानगरपालिका
:13:49